


# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे



✻ कराड (जि.सातारा) ✻ वर्ष - २ रे. ✻ अंक ८३ वा. ✻ गुरुवार दि.०८ ऑक्टोबर २०२६ ✻ पृष्ठे ४ ✻ किंमत : १ रुपये ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

✻ Karad (Dis.Satara) ✻ Vol - 2 ✻ Ishue - 83 ✻ Thuresday 08 October 2026 ✻ Page - 4 ✻ Price - 1 Rs. ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

## दुष्काळग्रस्त महाराष्ट्रासाठी केंद्राकडे विशेष मदतीची मागणी

नवी दिल्ली : महाराष्ट्रातील गंभीर दुष्काळी परिस्थितीची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना देत केंद्र सरकारकडून विशेष मदतीची मागणी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दोन दिवसीय दिल्ली दौऱ्यात बुधवारी अमित शाह यांची भेट झाली. राज्यातील सुमारे ३२ जिल्ह्यांमध्ये दुष्काळाची गंभीर परिस्थिती असून जवळपास ८० टक्के तालुके बाधित असल्याचे मुख्यमंत्र्यांनी निदर्शनास आणून दिले.

राज्य सरकारने केंद्राकडे पाठविलेल्या आगाऊ प्रस्तावाची प्रतही मुख्यमंत्र्यांनी शाह यांना दिली. दुष्काळाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान महाराष्ट्रातील विविध भागांचा दौरा करणार आहे. या पाहणीचा अहवाल आणि राज्य सरकारचा प्रस्ताव यांच्या आधारे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीतून मदतीबाबत निर्णय घेतला जाणार आहे. केंद्र सरकार



महाराष्ट्राच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहील, असे आश्वासन अमित शाह यांनी दिल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याशी झालेल्या चर्चेचा संदर्भ देत मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, दुष्काळ निश्चित करताना उपग्रह प्रतिमांसोबत पावसातील खंड, भूजल पातळी, पिकांचे नुकसान आणि प्रत्यक्ष पाहणी या निकषांचाही विचार केला जाईल. सुमारे २० तालुक्यांमध्ये पिकांच्या नुकसानीच्या आधारे मदतीची प्रक्रिया सुरू आहे. केंद्राची मदत मिळण्यास विलंब होऊ शकतो, त्यामुळे राज्य सरकार उपलब्ध निधीतून शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याच्या तयारीत आहे. सुमारे २३ हजार गावांमध्ये काही पिकांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून उर्वरित सर्वेक्षण वेगाने सुरू आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांनी केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेऊन नागपूर विमानतळाच्या नव्या टर्मिनलसाठी आवश्यक २७ एकर जागेच्या हस्तांतरणाचा प्रश्न मार्गी लावला. तसेच एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत सरकार विद्यार्थ्यांच्या पाचही मागण्यांवर सकारात्मक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## दुर्गोत्सवाची लगबग; मूर्तींचे दर वाढले

कराड(प्रतिनिधी): नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कराड शहरासह ग्रामीण भागात दुर्गोत्सवाची तयारी आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.

दुर्गामातेच्या मूर्तींना अंतिम रंगरंगोटी देण्याचे काम मूर्तिकारांकडून वेगाने सुरू असून, उत्सव मंडळांनीही मूर्तींची आगाऊ बुकिंग करून सजावट, विद्युत रोषणाई आणि मंडप उभारणीच्या कामांना सुरुवात केली आहे.

यंदा मूर्तींच्या किमतीत गतवर्षीच्या तुलनेत दोन ते अडीच हजार रुपयांची वाढ झाली आहे. रंगांच्या किमती, तसेच उत्पादन खर्चात झालेली वाढ यामुळे मूर्तींच्या दरात वाढ करावी लागल्याचे मूर्तिकार अशोक कुंभार व मीनाक्षी कुंभार यांनी सांगितले.

उत्सवासाठी विविध



आकारांच्या आणि आकर्षक रंगसंगतीतील मूर्ती तयार करण्यात आल्या आहेत.

शहरासह गावोगावी मंडप उभारणीला वेग आला असून, आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई आणि परिसर सुशोभीकरणाची कामे सुरू झाली आहेत. नवरात्रोत्सवासाठी बाजारपेठेतही विविध साहित्य दाखल झाले आहे. टिपऱ्या, विद्युत माळा, सजावटीचे साहित्य आणि अन्य पूजाविधीचे साहित्य खरेदीसाठी उपलब्ध झाले असून, आगामी दिवसांत बाजारपेठेतील गर्दी आणखी वाढण्याची शक्यता आहे.

## पारधी मतदारांची नावे वगळू नका



कराड : मतदार याद्यांच्या 'विशेष सखोल पुनरिक्षणा'त २००२ पूर्वीच्या मतदार यादीत नावे नसल्याच्या कारणावरून पारधी समाजातील मतदारांची नावे वगळली जाऊ नयेत, अशी मागणी पारधी मुक्ती आंदोलनाच्या शिष्टमंडळाने प्रशासनाकडे केली आहे. याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, तसेच निवडणूक उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. पारधी समाजातील अनेक कुटुंबांच्या मतदार म्हणून नोंदी संबंधित गावांमध्ये २००६-०७ पासून झालेल्या आहेत. त्यामुळे २००२ सालच्या मतदार यादीत नाव आढळले नाही म्हणून सध्याच्या मतदार यादीतील नावे वगळल्यास संबंधित नागरिक मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहण्याची शक्यता आहे.

## औंध गटातील पिकांचे पंचनामे तातडीने करा

### एकही बाधित शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित राहू नये : मनीषा फडतरे

औंध : शासनाने खटाव तालुक्यात दुष्काळ जाहीर केल्याच्या पार्श्वभूमीवर औंध गटातील नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून प्रत्येक पात्र शेतकऱ्याला शासकीय मदतीचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी जिल्हा परिषद सदस्य मनीषा योगेश फडतरे यांनी केली. लोणी येथे पत्रकारांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या.

त्या म्हणाल्या, खटाव तालुक्यातील शेतकरी सातत्याने नैसर्गिक संकटांचा सामना करीत आहेत. यंदाही पावसाच्या लहरीपणामुळे अनेक ठिकाणी



हातातोंडाशी आलेली पिके करपून गेली असून, शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे त्यांच्या आर्थिक नियोजनावर परिणाम झाला आहे.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या मदतीचा लाभ मिळण्यासाठी त्यांच्या पिकांचे पंचनामे होणे आवश्यक आहे. महसूल विभागाने औंध गटातील प्रत्येक गावात प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे तातडीने पूर्ण करावेत, अशी मागणी फडतरे यांनी केली.

पंचनामे करून घेताना शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. गरज भासल्यास पंचनाम्याची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याची तयारी असल्याचेही त्यांनी सांगितले.

औंध गटातील एकही बाधित शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित राहता कामा नये. प्रशासनाने गावोगावी पाहणी करून नुकसानीचे अचूक मूल्यांकन करावे आणि पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा लाभ मिळवून द्यावा, असे आवाहन मनीषा फडतरे यांनी केले.

## सरकारच्या तिजोरीवर शेतकऱ्यांचा पहिला हक्क : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

परभणी : संपूर्ण मराठवाडा दुष्काळाच्या सावटाखाली सापडला आहे. दुष्काळाचे राजकारण करण्याची ही वेळ नाही. शेतक-यांच्या पाठीशी भक्कमपणे कसे उभे राहता येईल यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला पाहिजे. सरकारच्या तिजोरीवर शेतक-यांचा पहिला हक्क आहे. त्यामुळे आपत्कालीन स्थितीत शेतक-यांना मदतीचा हात देण्यासह कष्टक-यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचा संकल्प राज्य व केंद्र सरकारने सोडला आहे. शेतक-यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

परभणीतील स्टेडिअम मैदानावर बुधवार, दि.७ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित गौरव अभियानाच्या अंतर्गत परभणी जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी, गरजू कुटुंबांच्या मदतीसाठी शिवसेनेद्वारे विशेष उपक्रम राबविण्यात आला.

याप्रसंगी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी आयोजक तथा खा. संजय जाधव, खा. नागेश पाटील आष्टीकर, आ. संतोष बांगर, संपर्क प्रमुख आनंद जाधव, आ. सईद खान, माजी खा. सुरेश जाधव, माजी आ. हरिभाऊ लहाने, प्रथम महापौर प्रताप देशमुख, जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, जिल्हाप्रमुख विशाल कदम, ज्येष्ठ नेते भास्कर लंगोटे, राजू कापसे, सखुबाई लटपटे, अतूल सरोदे आदी उपस्थित होते.

## साहिल जाधवने साताऱ्याचे नाव साता समुद्रापार झळकावले-ना.शिवेंद्रसिंहराजे

### सुवर्णपदक विजेत्या साहिलचा केला सन्मान

सातारा- आपल्या साताऱ्याचा सुपुत्र, तिरंदाज साहिल जाधव याने जिद्द, मेहनत, कष्ट आणि अथक परिश्रमाच्या जोरावर आशियाई स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी करून सुर्वणपदकाला गवसणी घातली. साहिलने मिळवलेल्या यशाचा एक सातारकर म्हणून सार्थ अभिमान आहे. साहिलने साताऱ्याचे नाव सातासमुद्रापार झळकावले असून याबद्दल त्याचे मनपूर्वक अभिनंदन, असे गौरवोद्गार राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी काढले. आशियाई क्रीडा स्पर्धेत तिरंदाजीमध्ये भारताला सुवर्णपदक मिळवून



देणाऱ्या साहिल जाधव याच्या निवासस्थानी भेट देऊन ना. शिवेंद्रसिंहराजे यांनी त्याचा विशेष सन्मान करून त्याचे अभिनंदन केले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष राजू भोसले, नगराध्यक्ष अमोल मोहिते, नगरसेवक फिरोज पठाण, सुशांत महाजन, हरीश पाटणे, आप्पा घुले यांच्यासह विविध मान्यवर आणि जाधव कुटुंबीय उपस्थित होते. ना. शिवेंद्रसिंहराजेंनी साहिलशी मनमोकळा संवाद साधत साधून आशियाई क्रीडा स्पर्धेतील त्याच्या अनुभवांबाबत आणि उल्लेखनीय कामगिरीबाबत चर्चा केली. त्याने घेतलेल्या मेहनतीचे आणि जिद्दीचे कौतुक करून त्याच्या पुढील यशस्वी क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## चार हजारांचा दर जाहीर केल्यावरच ऊसाला कोयता

### चचेगावचा ऊसतोडीस नकार; हंगामाच्या तोंडावर शेतकरी आक्रमक

कराड(प्रतिनिधी):यंदाच्या ऊस गळीत हंगामाच्या सुरुवातीलाच ऊसदराचा मुद्दा तापला आहे. कराड तालुक्यातील चचेगाव येथील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ऊसाला चार हजार रुपये प्रतिटन दर जाहीर केल्याशिवाय ऊसतोड सुरू न करण्याचा निर्णय घेतला आहे. दर जाहीर करण्यापूर्वी ऊसतोड सुरू करण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला विरोध करण्याची भूमिकाही शेतकऱ्यांनी घेतली आहे.

गळीत हंगाम सुरू करण्यासाठी कारखान्यांची तयारी सुरू असताना चचेगावातील शेतकऱ्यांनी दराचा मुद्दा थेट पुढे आणला आहे. ऊसतोडीपूर्वी दर निश्चित करावा, त्यानंतरच शेतात कोयता चालवावा, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली. त्यामुळे यंदाच्या हंगामाच्या प्रारंभीच कारखाना व्यवस्थापनांसमोर ऊसदर निश्चित करण्याचे आव्हान उभे राहिले आहे.

ऊस उत्पादनासाठी खत, औषधे,



मशागत, मजुरी, पाणी आणि वाहतूक यांसह विविध बाबींवरील खर्च सातत्याने वाढत आहे. वाढत्या उत्पादन खर्चाच्या तुलनेत शेतकऱ्यांना समाधानकारक परतावा मिळावा, यासाठी यंदा किमान चार हजार रुपये प्रतिटन दर मिळावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

चचेगावातील शेतकऱ्यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे ऊसदराचा प्रश्न हंगाम सुरू होण्यापूर्वीच ऐरणीवर आला असून, पुढील काळात इतर गावांतील शेतकऱ्यांची भूमिका काय राहणार, याचीही उत्सुकता आहे.दर जाहीर होईपर्यंत ऊसतोड बंदऊसदर निश्चित न करता ऊसतोड सुरू करण्यास शेतकऱ्यांचा विरोध राहणार आहे. चार हजार रुपये प्रतिटन दर जाहीर झाल्यानंतरच ऊसतोडीस परवानगी देण्याची भूमिका चचेगावातील शेतकऱ्यांनी घेतली आहे.



## तयारी दुर्गा देवी नवरात्रोत्सवाची

येत्या रविवार पासून दि. ११ ऑक्टोबर पासून संपूर्ण देशात दुर्गा नवरात्रोत्सवांना मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात प्रारंभ होत आहे .पक्ष पंधरवड्याच्या नंतर हा नऊ दिवसांचा देवी उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे .यासाठी सातारा शहरातील राजवाडा परिसरात नवरात्र स्थापनेसाठी लागणारे मातीचे सुघट अर्थात मातीची मडकी, सप्तधान्य, नाडापुडी ,हळदीकुंकू, शेतासाठी माती आदी पूजा साहित्य मोठ्या प्रमाणात विक्रीस उपलब्ध झाले आहे. फोटो.. अतुल देशपांडे, सातारा.



संपादकीय

गोरख तावरे

# देशभर निदर्शने

मतदार यादीच्या 'विशेष सखोल पुनरिक्षण' (एसआयआर) प्रक्रियेतील कथित घोटाळे आणि अंतर्गत गोंधळाच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, मध्य प्रदेश, हरियाणा, छत्तीसगड, उत्तराखंडमध्ये काँग्रेस कार्यकर्त्यांनी तीव्र निदर्शने केली. आग्र्यात मुख्य निवडणूक आयुक्तांच्या घराला काळे फासून, शाईफेक करून 'ज्ञानेश कुमार गद्दार, मतचोर' असे लिहून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. राजस्थानात पायी मोर्चा काढणारे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्यासह कार्यकर्त्यांवर पाण्याचा मारा करून त्यांना ताब्यात घेण्यात आले. निवडणूक आयोगाच्या अंतर्गत रचनेत आणि मतदार याद्यांमध्ये नाव वाढवणे/वगळणे याबाबत इतर दोन निवडणूक आयुक्तांनी (सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी) ज्ञानेश कुमार यांच्या काही एकतर्फी व घाईघाईने घेतलेल्या निर्णयांवर लेखी आक्षेप घेतले होते.

काँग्रेस खासदार राहुल गांधी आणि विरोधी पक्षांचा असा आरोप आहे की, ज्ञानेश कुमार हे इतर आयुक्तांचे न ऐकता मनमानी पद्धतीने काम करत असून त्यांनी विरोधी पक्षांचे मतदार वगळण्याचे घटनाबा पाऊल उचलले आहे, जे देशद्रोहासारखे आहे. या प्रकरणी विरोधी पक्षांनी संसदेत मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्ध महाभियोग आणण्याची तयारी सुरू केली आहे. लखनौमध्ये काँग्रेस कार्यकर्ते पोलिसांशी भिडले तर काशी, वाराणसीत काँग्रेसच्या महिला कार्यकर्त्यांनी बांगड्या घेऊन आंदोलन केले. ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत उत्तर प्रदेशात काँग्रेस कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. जयपूरमध्ये शहीद स्मारक येथे सभा झाल्यानंतर काँग्रेस नेत्यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत पायी मोर्चा काढला. मध्य प्रदेशात मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनाच्या विरोधात भोपाळमध्ये काँग्रेसने जोरदार आंदोलन केले. या दरम्यान पोलिस आणि कार्यकर्त्यांमध्ये धक्काबुक्की झाली. काही कार्यकर्ते बॅरिकेड्सवरही चढले तसेच प्रतीकात्मकरीत्या ज्ञानेश कुमारांना बेड्याही घालण्यात आल्या. बिहार मतचोरीविरोधात बिहारमध्ये काँग्रेसने हल्लाबोल करत पाटणा-औरंगाबादमध्ये आक्रोश मोर्चा काढला.

# ज्ञानेश कुमार यांच्या निषेधार्थ साताऱ्यात आज जनआंदोलन



सातारा : मतदार सखोल पडताळणी प्रक्रियेसह विविध मुद्द्यांवर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या भूमिकेचा निषेध करण्यासाठी रिपब्लिकन जनता आंदोलनाच्या वतीने गुरुवारी (८) सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जनआंदोलन करण्यात येणार आहे. जिल्हाध्यक्ष अशोक भोसले आणि प्रांताध्यक्ष पार्थ पोळके यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन होणार असल्याची माहिती अनिल वीर यांनी दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ झालेल्या सहविचार सभेत तसेच विकासनगर येथे आयोजित वर्षावास कार्यक्रमात वीर यांनी आंदोलनाची माहिती दिली. मतदार सखोल पडताळणी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचा आरोप करीत मुख्य निवडणूक आयुक्तांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा भारतीय बौद्ध महासभेचे हिशेब तपासणीस नंदकुमार काळे, बाळासाहेब जाधव, माजी पीएसआय रामदास वाघमारे, सम्यक ज्येष्ठ नागरिक संघाचे शामराव बनसोडे, माजी गटशिक्षणाधिकारी दिलीप भोसले, पोलीस दीपक रणदिवे, दिलीप कांबळे, व्ही. बबन, अरुण साळुंखे, अंकुश धाइंजे, सीताराम गायकवाड, कास्ट्राईब संघटनेचे जिल्हाध्यक्ष मारुती भोसले, अशोक कांबळे, विकास तोडकर, रवींद्र रणबागले आदी उपस्थित होते.

# मोतिबिंदू शिबिरात ६४ रुग्णांची तपासणी; ३४ जण शस्त्रक्रियेसाठी रवाना

## रघुनाथ म्हात्रे यांच्या स्मरणार्थ नागोठण्यात मोफत शिबिर

नागोठणे : कै.रघुनाथ म्हात्रे यांच्या स्मरणार्थ नागोठणे लायन्स क्लबच्या वतीने मोफत मोतिबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. बाळासाहेब ठाकरे नगर येथील लायन्स क्लबच्या सभागृहात बुधवारी (७) झालेल्या या शिबिराचा ६४ रुग्णांनी लाभ घेतला. त्यापैकी ३४ रुग्णांची मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करून त्यांना नवीन पनवेल येथील आर. झुनझुनवाला-शंकरा आय रुग्णालयात पाठविण्यात आले.

लायन्स क्लबचे अध्यक्ष विलास चौलकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिबिराचे आयोजन नागोठणे लायन्स क्लबने केले होते. शिवसेना युवासेना (शिंदे गट) रायगड जिल्हाध्यक्ष संजय म्हात्रे यांच्या सौजन्याने आणि आर. झुनझुनवाला-शंकरा आय रुग्णालय, नवीन पनवेल यांच्या सहकार्याने हे शिबिर घेण्यात आले. यावेळी विलास चौलकर यांनी लायन्स क्लबच्या विविध सेवाभावी उपक्रमांची माहिती दिली. १ ते ८ ऑक्टोबरदरम्यान सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून, त्याअंतर्गत आरोग्यविषयक उपक्रमांसह विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांना सेवा देणे हा क्लबच्या कार्याचा केंद्रबिंदू असल्याचेही त्यांनी नमूद केले.

संजय म्हात्रे यांनी लायन्स क्लबच्या सेवाभावी कार्याचे कौतुक केले. सामाजिक बांधिलकीतून अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. शिबिरासाठी क्लबचे विवेक सुभेकर, यशवंत चित्रे, प्रकाश जैन, जयराम पवार, दीपक गायकवाड यांच्यासह पदाधिकारी व सदस्यांनी सहकार्य केले. शंकरा आय रुग्णालयाचे डॉ. मोशीन सय्यद, विजय बामणे, नियती शिंदे, प्राची गायकवाड यांनी रुग्णांची तपासणी केली.

यावेळी संतोष शहासने, सखाराम ताडकर, संजय काकडे, सुनील कुथे, सिद्धेश काळे, विजय शहासने, ड. महेंद्र धामणे, दीपक लोणारे, मोहन म्हात्रे, ड. स्मिता कुथे, विद्या म्हात्रे, अनुराधा शहासने तसेच क्लबचे पदाधिकारी, सदस्य, रुग्ण व नागरिक उपस्थित होते. स्मिता कुथे यांनी आभार मानले.

# भयपट शॉर्टफिल्म 'शापित ग्रंथ' प्रेक्षकांच्या भेटीस

मुंबई : कोकण निसर्गसौंदर्य आणि जंगल यांचा वापर करून शूटिंग झालेला भयपट काल रात्री मुंबईत रिलीज झाला. ग्रामीण भागातील लोककथांचा वारसा जपलेले रज्जाक शेख यांची यात प्रमुख भूमिका असून त्यांनी त्या भूमिकेला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

मुंबईच्या लय भारी प्रॉडक्शन प्रस्तुत भयपट शॉर्टफिल्म 'शापित ग्रंथ' यात लेखिका व कथा सौ. प्रांजली काळबेंडे, दिग्दर्शक, निर्माता, संवादलेखन व पटकथा श्री. प्रमोद न. सूर्यवंशी, सहदिग्दर्शक श्री. संतोष रामचंद्र जाधव, सहनिर्माता श्री. हरिशचंद्र दळवी , मुख्य कलाकार श्री. रज्जाक शेख, सौ. स्मितादेशमुख, श्री. योगेश हरणे, उपासना किरपण, बालकलाकार कु. समीक्षा सागर नाईक, कु. आर्या शिव कोरे, सहकलाकार सौ. रेखा चंद्रकांत हरियाण, श्री. शिव कोरे, श्रीराम घडे, सौ. वंदना नागणे, श्री. संतोष जाधव, सौ. वसुधा नाईक, श्री. उल्हास किरपण, कला दिग्दर्शक सौ. रेखा चंद्रकांत हरियाण, श्री. प्रमोद पाताडे, सिनेमॅटोग्राफी निखिल





हातणकर, श्री. योगेश हरणे, मेकअप सौ. रेखा चंद्रकांत हरियाण, कॉस्च्युम डिझाइन लय भारी टीमने केले असून लघुपटाला खूप प्रतिसाद मिळत आहे.

रज्जाक शेख यांच्या मते, 'शापित ग्रंथ' हा एक थरारक आणि अविस्मरणीय अनुभव होता. 'शापित ग्रंथ' ही हॉरर शॉर्ट फिल्म रिलीज झाली आणि सर्वांच्या कामगिरीचा अभिमान वाटला. भीतीची अतिशय प्रभावी मांडणी, उत्कंठावर्धक प्रसंग आणि उत्कृष्ट दर्जाचे सादरीकरण यामुळे हा लघुपट मनाला भिडतो. या भयपटातील प्रत्येक कलाकाराने आपल्या भूमिकेला न्याय देण्यासाठी घेतलेली मेहनत, आपलेपणा आणि समर्पण खरोखरच कौतुकास्पद आहे. पडद्यावर दिसणाऱ्या प्रत्येक प्रसंगामागे अनेक तासांची मेहनत आणि जिद्द आहे, हे यातून जाणवते.

त्याचबरोबर या लघुपटासाठी त्यांनी आपला अमूल्य वेळ दिला, आपले घर उपलब्ध करून दिले आणि संपूर्ण टीमला मनापासून सहकार्य केले, त्या प्रत्येक व्यक्तीचे मनःपूर्वक आभार आणि कौतुक. 'शापित ग्रंथ' हा केवळ एक हॉरर शॉर्ट फिल्म नसून, अनेकांच्या मेहनतीतून साकारलेला एक अविस्मरणीय अनुभव आहे.

# तुकाराम मुंडे १७ ऑक्टोबरला कराडमध्ये

कराड(प्रतिनिधी): शिस्त, कर्तव्य आणि प्रशासनातील कार्यपद्धतीबाबत स्पष्ट भूमिका मांडणारे आयएएस अधिकारी तुकाराम मुंडे यांचे विचार ऐकण्याची संधी कराडकरांना मिळणार आहे. कराड नगरपरिषद नगरवाचनालयाच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित 'शारदीय व्याख्यानमाला-२०२६'मध्ये शनिवारी (१७ ऑक्टोबर) तुकाराम मुंडे यांचे 'संवाद तरुणाईशी' या विषयावर व्याख्यान होणार आहे. यशवंतराव चव्हाण स्मृतिसदन (टाऊन हॉल) येथे सायंकाळी ६.३० वाजता हा कार्यक्रम होईल. तरुणाईसमोरील आव्हाने, बदलते सामाजिक वास्तव, करिअर, शिस्त, कर्तव्य आणि सामाजिक जबाबदारी यांसह विविध विषयांवर मुंडे काय भूमिका मांडतात, याकडे कराडकरांचे लक्ष लागले आहे. तुकाराम मुंडे यांच्या स्पष्टवक्तेपणामुळे आणि प्रशासनातील कामाच्या शैलीमुळे त्यांचे व्याख्यान ऐकण्यासाठी तरुणांसह नागरिकांची उत्सुकता वाढली आहे. विशेषतः बदलत्या काळात तरुणांनी स्वतःकडे आणि समाजाकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहावे, याबाबत ते कोणते विचार मांडतात, हे व्याख्यानाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे.

# मातेचे स्वागत करूयात

जेव्हा शारदीय नवरात्र सुरू होते तेव्हा नवरात्रीच्या पहिल्या दिवशी आपण घरामध्ये जेव्हा घटस्थापना करतो त्या वेळेपासूनच घटाच्या माध्यमातून साक्षात आदिशक्ती आपल्या घरामध्ये नऊ दिवसांसाठी वास्तव्यास आलेली असते.

मातेच्या अस्तित्वाने आपल्या घरातील वातावरण शुद्ध, सात्विक झालेले असते. घरामध्ये आपण घटरूपी देवीची जशी स्थापना करतो तशी स्थापना आपण आपल्या मनामध्ये गुणरूपी देवीचे तत्व कार्यरत व्हावे यासाठी करायची असते. आपल्यामध्ये गुणांचे संवर्धन व्हावे यासाठी आपले आपणच प्रयत्न करायचे असतात. कारण, जिथे चांगले वाटते तिथेच मातेला राहायला **आवडते.**

**माता का**यमस्वरूपी आपल्या हृदयामध्ये राहावी असे वाटत असेल तर मातेच्या स्वागतासाठी आपले मन आपण निर्मळ आणि पवित्र करणे आवश्यक असते. नवरात्रीच्या काळात अखंड दीप ठेवतात तसाच देवीने ही आपल्या अंतर्मनामध्ये

भाव,भक्ती, श्रद्धा, तळमळ यांचे दीप लावलेले आहेत. ते दीप अखंड तेवत ठेवणे हीच आपली साधना आहे. हे दीप अखंड तेवत ठेवण्यासाठी आपण अयोग्य गोष्टींपासून दूर राहण्यासाठी स्वतःच प्रयत्न करायला हवेत. तरच देवीची आपल्यावर निश्चित कृपा होणार आहे.

- संगिता भोसले, सातारा.

# शिंपल्यांचा चुना आणि खनिजांचा चुना यांविषयी धर्मशास्त्रीय शंकासमाधन

हिंदू धर्मात चातुर्मासाला विशेष महत्त्व आहे. स्कंद पुराण, धर्मसिंधु आणि निर्णयसिंधु यांसारख्या धर्मग्रंथांमध्ये चातुर्मासातील आचार-विचार, व्रते आणि वर्ज्य पदार्थ यांविषयी मार्गदर्शन केले आहे. या काळात अहिंसा, साधना आणि शुद्धता यांना विशेष महत्त्व दिले जाते. त्यामुळे पानासोबत वापरल्या जाणाऱ्या चुन्याच्या प्रकाराबाबतही अनेकांच्या मनात प्रश्न निर्माण होतात.

### शिंपल्यांपासून चुना बनतो का?

बाजारात उपलब्ध असलेल्या चुन्यांपैकी काही प्रकार समुद्रातील शंख, शिंपले आणि जलचरांच्या कवचांवर प्रक्रिया करून तयार केले जातात. आयुर्वेदात चुन्याशी संबंधित पदार्थांना 'सुधा' आदी संज्ञा आढळतात. 'रसतरंगिणी' आणि 'भावप्रकाश' यांसारख्या ग्रंथांमध्ये चुन्याच्या विविध स्रोतांचा उल्लेख असून शंखभस्म आणि शुक्तीभस्म यांसारखे पदार्थही वर्णन केले



आहेत. धर्मशास्त्रीय दृष्टिकोनातून शंख-शिंपले हे जलचर प्राण्यांच्या शरीराशी संबंधित असल्याने त्यांपासून तयार होणारा चुना चातुर्मासातील शुद्धतेच्या आचारात वर्ज्य मानला जातो, असे या लेखात नमूद करण्यात आले आहे. विशेषतः प्राणिजन्य पदार्थांचा त्याग करण्याच्या भावनेतून हा नियम पाळला जातो.

### खनिज किंवा दगडी चुना कसा ओळखावा?

शिंपल्यांचा चुना आणि खनिज चुना केवळ दिसण्यावरून ओळखणे कठीण असते. त्यामुळे शुद्धतेबाबत काळजी घेणाऱ्यांनी 'दगडी चुना' किंवा 'खड्याचा चुना' वापरण्याचा पर्याय स्वीकारावा, असे सुचविण्यात आले आहे. चुनखडीसारख्या खडकांपासून मिळणारा चुना हा खनिज स्वरूपाचा असल्याने तो प्राणिजन्य पदार्थांपासून तयार होत नाही. बाजारातील तयार चुन्याबाबत शंका असल्यास ओळखीच्या विक्रेत्याकडून किंवा आयुर्वेदिक औषधालयातून खनिज स्वरूपाचा दगडी चुना मागून घेणे अधिक योग्य ठरेल, असे लेखात म्हटले आहे.

### देवाला तांबूल अर्पण करताना काय काळजी घ्यावी?

पूजाविधीमध्ये देवाला तांबूल अर्थात विडा अर्पण करण्याची प्रथा आहे. चुन्याच्या शुद्धतेबाबत खात्री असल्यास खनिज किंवा दगडी चुना वापरून तांबूल अर्पण करता येईल. मात्र, चुन्याच्या स्रोताबाबत शंका असल्यास चुन्याचा वापर टाळून केवळ नागवेलीचे पान, सुपारी, लवंग, वेलची आणि काथ यांचा 'सुका तांबूल' अर्पण करण्याचा पर्याय स्वीकारता येतो.

उपासनेमध्ये बाह्य उपचारांपेक्षा भक्तिभावाला अधिक महत्त्व असल्याचे धर्मपरंपरेत सांगितले जाते. त्यामुळे शुद्धतेबाबत संभ्रम असेल तर अशुद्ध वस्तू अर्पण करण्यापेक्षा उपलब्ध शुद्ध पर्यायाचा वापर करणे श्रेयस्कर ठरते.

### सात्त्विक आचरण हाच उद्देश

चातुर्मासातील नियम केवळ कर्मकांडापुरते मर्यादित नसून आहार-विहार आणि आचरणात सात्त्विकता निर्माण करण्याच्या उद्देशाने असल्याचे या लेखात स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे कोणत्याही वस्तूचा वापर करताना तिचा स्रोत, शुद्धता आणि धार्मिक आचाराशी असलेला संबंध यांचा विचार करणे आवश्यक आहे. श्रद्धा, शुद्धता आणि अंतःकरणातील भाव यांना प्राधान्य देऊन आचरण केल्यास उपासनेचा उद्देश अधिक अर्थपूर्ण ठरतो.

**- श्री. चेतन राजहंस,**
राष्ट्रीय प्रवक्ता, सनातन संस्था

# पाटण शहरासाठी अत्याधुनिक सक्शन मशीन दाखल

## सांडपाणी व गाळ उपशासाठी सुविधा; स्वच्छता व्यवस्थेला मिळणार गती

पाटण : सातारा जिल्हा बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर आणि भारतीय जनता पक्षाचे सातारा जिल्हा सरचिटणीस याज्ञसेनसिंह पाटणकर यांच्या विशेष प्रयत्नांतून महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत पाटण नगरपंचायतीच्या ताफ्यात अत्याधुनिक सक्शन मशीन दाखल झाले आहे. सांडपाणी व गाळ उपसा करणाऱ्या या मशीनचा लोकार्पण सोहळा याज्ञसेनसिंह पाटणकर यांच्या हस्ते उत्साहात झाला.



पाटण शहरातील वाढते शहरीकरण लक्षात घेता गटारे, नाले आणि सांडपाणी व्यवस्थापनाची स्वच्छता राखणे नगरपंचायतीसमोर मोठे आव्हान बनले आहे. या पार्श्वभूमीवर नव्याने उपलब्ध झालेल्या सक्शन मशीनमुळे गटारे, नाले तसेच सांडपाणी व्यवस्थेतील गाळ व सांडपाणी तातडीने उपसण्यास मदत होणार आहे. त्यामुळे शहरातील स्वच्छता व्यवस्थेला अधिक गती मिळून नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही ही सुविधा उपयुक्त ठरणार आहे.

यावेळी याज्ञसेनसिंह पाटणकर म्हणाले, स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातून पाटण शहराचा कायापालट करणे हेच आमचे ध्येय आहे. सक्शन मशीनच्या माध्यमातून शहरातील नागरिकांना आधुनिक स्वच्छता सुविधा उपलब्ध झाली आहे. 'एकच लक्ष, शहर स्वच्छ' हा संकल्प ठेवून नगरपंचायत करीत असलेले काम कौतुकास्पद आहे. या सुविधेमुळे पाटण अधिक स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी होण्यास मदत होईल.

नगरपंचायतीने नागरिकांच्या आरोग्याला प्राधान्य देत ही सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे. सांडपाणी व गाळ व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करण्यासाठी हे मशीन महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. पाटण नगरपंचायतीचे मुख्याधिकारी सत्यम जगदाळे, शहर समन्वयक अरुण नागरगोजे, कार्यालय अधीक्षक शिंदे, विभागप्रमुख इंगळे, नगरसेवक स्वप्नील माने, सागर पोतदार, सागर मोरे, शशिकांत देवकांत उपस्थित होते.

# नवरात्रोत्सवानिमित्त 'मैं हूँ दुर्गा' अभियान; हिंदू युवतींसाठी देशभरात विनामूल्य स्वसंरक्षण प्रशिक्षणवर्गांचे आयोजन

सातारा : नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हिंदू जनजागृती समितीच्या वतीने हिंदू युवती व महिलांसाठी देशभरात 'मैं हूँ दुर्गा' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत विविध शहरांमध्ये १५ वर्षांवरील युवतींसाठी विनामूल्य स्वसंरक्षण प्रशिक्षणवर्ग आयोजित करण्यात येणार असून महिला सुरक्षेविषयी जनजागृती करणारे विविध दृकश्राव्य संदेश आणि प्रेरणादायी शौर्यगीते प्रसारित केली जाणार असल्याची माहिती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते रमेश शिंदे यांनी दिली.

युवती व महिलांना छेडछाड, पाठलाग, ऑनलाइन त्रास, लैंगिक छळ, धमकी, ब्लॅकमेलिंग तसेच हिंसक हल्ल्यांसारख्या घटनांना सामोरे जावे लागू शकते. अशा परिस्थितीत भीती न बाळगता प्रसंगावधान, आत्मविश्वास आणि स्वसंरक्षणाचे कौशल्य विकसित व्हावे, या उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत असल्याचे समितीने सांगितले. समितीच्या प्रसिद्धीपत्रकात काही युवतींना खोटी ओळख





सांगून प्रेमाच्या जाळ्यात ओढणे, त्यानंतर ब्लॅकमेलिंग किंवा धर्मांतरासाठी दबाव आणणे, अशा प्रकारच्या घटनांचा दावा करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर युवतींमध्ये जागरूकता निर्माण करणे आवश्यक असल्याचे समितीने म्हटले आहे.

स्वसंरक्षण प्रशिक्षणवर्गांमध्ये शारीरिक प्रतिकाराची प्राथमिक तंत्रे शिकविण्यासोबतच संभाव्य धोका ओळखणे, संकटाच्या वेळी योग्य निर्णय घेणे आणि मानसिकदृष्ट्या खंबीर राहण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच आत्मविश्वास वाढविण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे समितीने स्पष्ट केले. अधिकाधिक युवतींनी या अभियानात सहभागी होऊन विनामूल्य स्वसंरक्षण प्रशिक्षण घ्यावे, असे आवाहन हिंदू जनजागृती समितीने केले आहे. सहभागी होण्यासाठी अभियानाच्या क्यूआर संकेताचा वापर करून किंवा समितीच्या संकेतस्थळावर नोंदणी करता येणार असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.


दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी माऊली ऑफसेट प्रेस, गट क्रमांक ३२४/३, बैल बाजार रोड, मलकापूर - कराड, ता. कराड, जि. सातारा पिन कोड ४१५५३९ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा - ४१५११० येथून प्रकाशित केले. * संपादक - गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Mauli Offset Press, Gat No.324/3, Bail Bajar Road, Malkapur-Karad, Tal- Karad, Dist- Satara Pin-415539, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# देवीच्या आगमनाची चाहूल; दुर्गामूर्तींच्या अंतिम कामांना वेग

उंब्रज : नवरात्रोत्सवाचे दिवस जवळ येताच परिसरातील मूर्तिकारांच्या कार्यशाळांमध्ये लगबग वाढली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या दुर्गामूर्ती निर्मितीच्या कामाने आता अंतिम टप्पा गाठला असून, मूर्तींना आकर्षक रूप देण्यासाठी रंगकाम, नेत्रांकन, अलंकार आणि सजावटीच्या कामांना वेग आला आहे. कार्यशाळांमध्ये सुरू असलेली ही धावपळ देवीच्या आगमनाची चाहूल देत आहे.



मातीला आकार देत देवीचे रूप साकारल्यानंतर मूर्तीला जिवंतपणा आणि उठाव देण्याचे काम सध्या सुरू आहे. देवीच्या चेहऱ्यावरील भाव, डोळ्यांचे नेत्रांकन, वस्त्रांची रंगसंगती, मुकुट तसेच विविध अलंकार याकडे कारागीर बारकाईने लक्ष देत आहेत. मूर्तीचे रूप अधिक देखणे आणि भावपूर्ण दिसावे यासाठी रंगछटांची निवडही काळजीपूर्वक केली जात आहे. नवरात्रोत्सव जसजसा जवळ येत आहे, तसतशी विविध मंडळांकडून दुर्गामूर्तींबाबत विचारणा आणि मागणी वाढत आहे. त्यामुळे मूर्तिकारांवरील कामाचा ताणही वाढला आहे. वेळेत मूर्तींची कामे पूर्ण करण्यासाठी कारागीर आणि त्यांचे सहकारी सकाळपासून रात्रीपर्यंत कार्यशाळांमध्ये व्यस्त असल्याचे चित्र आहे.

परंपरागत पद्धतीने मूर्ती घडविण्याची कला जपत असतानाच बदलत्या आवडीनिवडींचा विचार करून मूर्तिकार नवनवीन रंगसंगती आणि सजावटीच्या पद्धतींचा वापर करीत आहेत. पारंपरिक कलाकुसरीला आधुनिक तंत्र व सौंदर्यदृष्टीची जोड मिळत असल्याने यंदा विविध रूपांतील दुर्गामूर्ती साकारल्या जात आहेत. मूर्तीच्या प्रत्येक बारकाव्यातून देवीचे रूप अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न मूर्तिकारांकडून सुरू आहे. त्यामुळे कार्यशाळांमध्ये रंगांचा दरवळ, हातातील कुंचले आणि अखंड सुरू असलेली कारागिरांची लगबग नवरात्रोत्सवाच्या आगमनाची साक्ष देत आहे.

# पुणे विभाग पदवीधर, शिक्षक द्विवार्षिक निवडणूक जिल्हास्तरीय माध्यम संनियंत्रण आणि प्रमाणीकरण समिती कार्यान्वित

पुणे : पुणे विभाग पदवीधर, शिक्षक द्विवार्षिक निवडणूक- २०२६ च्या अनुषंगाने सहायक निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय माध्यम संनियंत्रण आणि प्रमाणीकरण समिती (एमसीएमसी) कार्यान्वित करण्यात आली असून निवडणूक प्रचारासाठी उपयोगात आणले जाणारे बल्क एसएमएस, रेकॉर्डेड व्हाईस मेसेजेस, इलेक्ट्रॉनिक माध्यमातील तसेच सर्व प्रकारच्या डिजिटल मीडिया जाहिराती यांना जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समितीकडून (एमसीएमसी) प्रमाणीकरण करुन घेणे बंधनकारक आहे,असे जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी कळविले आहे. निवडणूक प्रचारासाठी राजकीय पक्ष, उमेदवार तसेच त्रयस्थ व्यक्तींकडून विविध माध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असतो. या समितीमार्फत वृत्तपत्र आणि दूरचित्रवाणी वाहिन्यांवरील पेड न्यूजवर लक्ष ठेवण्यात येत आहे. निवडणूक प्रचाराच्या जाहिराती दूरचित्रवाणी वाहिन्या, केबल वाहिन्या, सिनेमा हॉल, रेडिओ, सार्वजनिक तसेच खासगी एफएम चॅनेल्स, सार्वजनिक ठिकाणी दाखविण्याच्या दृक-श्राव्य जाहिराती, बल्क एसएमएस, रेकॉर्ड केलेले व्हाईस मेसेजेस तसेच सोशल मीडिया, इंटरनेट संकेतस्थळावरुन प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीकडून प्रमाणीत करुन घेणे आवश्यक आहे. उमेदवारांच्या राजकीय जाहिरातींच्या प्रमाणीकरणासाठी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समितीशी (एमसीएमसी) जिल्हा माहिती कार्यालय, नवीन मध्यवर्ती इमारत, तळमजला, ससून सर्वोपचार रुग्णालयासमोर, पुणे ४११००१ दूरध्वनी क्र. ०२०-२६१२१३०७, ई-मेल diopunegmail.com या पत्त्यावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# नागोठणे शुद्ध पाणीपुरवठा योजनेला प्रशासकीय दिशा

नागोठणे : नागोठणे येथील शुद्ध पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयातील पाणीपुरवठा विभागाच्या अपर सचिव पराग जैन यांच्या दालनात महत्त्वपूर्ण बैठक झाली. खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत त्यांनी दूरध्वनीद्वारे सहभाग घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.



बैठकीस नागोठणेचे ज्येष्ठ नेते भाईसाहेब टके, माजी जिल्हा परिषद सदस्य किशोर जैन, सरपंच सुप्रिया महाडिक, उपसरपंच अकलाक पानसरे, ग्रामपंचायत सदस्य भाविका गिजे व विनीत पाटील यांच्यासह बाळासाहेब टके, मनोज टके, धनंजय जगताप, रायगड जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सरोदे, उपअभियंता मयूर मालवदे आणि नागोठणे ग्राम अधिकारी गोविंद शिद उपस्थित होते. बैठकीत नागोठणेच्या पाणीपुरवठा योजनेबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. सदर योजना रायगड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या देखरेखीखाली राबविण्यात येणार आहे. योजनेसाठी आवश्यक असलेला नवीन प्रस्ताव संबंधित विभागामार्फत तयार करण्यात येणार असून, त्यासाठी ग्रामपंचायतीचा ठराव घेण्यात येणार आहे. पाणीपुरवठा योजनेवरील वीज खर्च कमी करण्यासाठी सौरऊर्जा यंत्रणा बसविण्याचाही निर्णय घेण्यात आला. यासाठी ग्रामपंचायतीचा स्वतंत्र ठराव घेण्यात येणार असून, जॅकवेलजवळ तसेच जलशुद्धीकरण प्रकल्पाजवळ अशा दोन ठिकाणी सौरऊर्जा यंत्रणा उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. योजनेचा संपूर्ण व तांत्रिकदृष्ट्या आवश्यक प्रस्ताव जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत तयार करून पाणीपुरवठा विभागाचे अपर सचिव पराग जैन यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येणार आहे. नागोठणेकरांचा दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या पाणीपुरवठ्याच्या प्रश्नाला बैठकीमुळे प्रशासकीय पातळीवर दिशा मिळाली असून, आवश्यक ठराव व प्रस्तावाची कार्यवाही तातडीने पूर्ण करून शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती किशोर जैन यांनी दिली.

# महिला उत्पादक गटांच्या उद्योगातून आर्थिक सक्षमीकरणाला चालना

मसूर : बचत गटांच्या माध्यमातून महिलांनी केवळ बचत व कर्ज व्यवहारापुरते मर्यादित न राहता उद्योग-व्यवसायाच्या क्षेत्रातही पाऊल टाकले आहे. मसूर (ता. कराड) येथील रेवणसिद्ध महिला उत्पादक गट आणि आदिशक्ती महिला उत्पादक गटाच्या विविध व्यवसायांची जिल्हा अभियान व्यवस्थापनाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली. महिलांच्या या उपक्रमांना आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही यावेळी देण्यात आली.

जिल्हा व्यवस्थापक उपजीविका संजय निकम, जिल्हा अभियान व्यवस्थापक अंकुश मोटे, तालुका व्यवस्थापक निलेश पवार आणि कल्पतरू महिला प्रभाग संघाचे समन्वयक उस्मान मुलाणी यांनी दोन्ही उत्पादक गटांना भेट दिली.



यावेळी गटांच्या व्यवसायाची माहिती जाणून घेऊन उत्पादन, विक्री आणि बाजारपेठेबाबत चर्चा करण्यात आली. कल्पतरू महिला प्रभाग संघाचे पदाधिकारी तसेच उत्पादक गटातील महिला उपस्थित होत्या.

रेवणसिद्ध महिला उत्पादक गटामार्फत सुरू असलेल्या धान्य खरेदी-विक्री व्यवसायाची, तर आदिशक्ती महिला उत्पादक गटाच्या कापडी पिशव्या व विविध वस्तूंच्या छपाई व्यवसायाची पाहणी करण्यात आली. महिलांनी स्वतः पुढाकार घेऊन व्यवसाय उभारल्याबद्दल अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी संजय निकम म्हणाले, बचत गटांनी केवळ बचत आणि कर्ज व्यवहारापुरते मर्यादित न राहता उत्पादन, विक्री आणि लघुउद्योगाच्या माध्यमातून उत्पन्नाचे स्रोत निर्माण करावेत. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल. आदिशक्ती गटाच्या पिशवी छपाई व्यवसायासोबतच प्रत्यक्ष कापडी पिशवी निर्मिती सुरू करण्याचा सल्लाही निकम यांनी दिला. कच्चा माल, उत्पादन, बाजारपेठ आणि विक्री यांचा योग्य मेळ साधल्यास या व्यवसायातून गटांना अधिक उत्पन्न मिळू शकते, असे त्यांनी सांगितले.

# कराटे स्पर्धेत औंध आश्रमशाळेचे यश; तिघांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

औंध : जिल्हा क्रीडा विभाग, सातारा यांच्या वतीने आयोजित खटाव तालुकास्तरीय शालेय कराटे क्रीडा स्पर्धेत औंध येथील माध्यमिक आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. तीन विद्यार्थ्यांनी तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली.



१९ वर्षांखालील मुलींच्या गटात कु. सई सोमनाथ इंगळे हिने विजेतेपद पटकावले. तसेच १७ वर्षांखालील गटात साहिल प्रकाश कांबळे आणि कु. समर्थकुमार कांबळे यांनी प्रथम क्रमांक मिळविला. या तिन्ही विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजेत्या विद्यार्थ्यांसह त्यांना मार्गदर्शन करणारे प्रशिक्षक माने व जाधव यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीला आणखी बळ मिळाले आहे.

# सुरुळमध्ये केरा नदीवर ग्रामस्थांनी उभारला वनराई बंधारा

पाटण : पावसाने ओढ दिल्याने पाटण तालुक्यातील सुरुळ परिसरात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यासाठी ग्रामस्थांनी लोकसहभागातून जलसंधारणाचे काम हाती घेतले आहे. ग्रामपंचायतीच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांनी केरा नदीवर श्रमदानातून वनराई बंधारा उभारला.

गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने केरा नदीच्या पात्रातील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. नदीपात्रातील उपलब्ध पाणी वाहून जाऊ नये तसेच त्याचा साठा निर्माण व्हावा, या उद्देशाने ग्रामस्थांनी एकत्र येत वनराई बंधारा बांधला. वाळू व गोट्यांनी भरलेली पोती तसेच दगड-मातीचा वापर करून हा बंधारा उभारण्यात आला.



बंधाऱ्यामुळे नदीपात्रातील पाणी अडून राहण्यास मदत होणार असून, जनावरांच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटण्यास हातभार लागणार आहे. तसेच उपलब्ध पाण्याचा साठा टिकवून ठेवण्यास मदत होणार असल्याने आगामी काळातील पाणीटंचाईच्या परिसरातील पिण्याच्या पाण्यासह परिस्थितीत त्याचा उपयोग होण्याची अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सुरुळ ग्रामपंचायतीने जलसंधारणासाठी पुढाकार घेतला. प्रशासनाकडून मदतीची प्रतीक्षा न करता ग्रामस्थांनी श्रमदानातून हे काम पूर्ण केले. गावातील ग्रामपंचायत पदाधिकारी, प्रशासक सरपंच, सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी झाले होते. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी केवळ शासकीय योजनांवर अवलंबून न राहता स्थानिक पातळीवर लोकसहभागातून जलसंधारणाची कामे करण्याची गरज या उपक्रमातून अधोरेखित झाली आहे.

# मतदार नोंदणीतील तांत्रिक अडचणींमुळे नागरिकांची गैरसोय

## बीएलओंचे अर्जप्रक्रियेत अडथळे; सर्व्हरच्या समस्येमुळे हेलपाटे वाढले

मसूर : मतदार यादीत नाव नोंदविणे, नावातील दुरुस्ती करणे अथवा स्थलांतरित मतदारांची नोंदणी करण्याच्या प्रक्रियेत तांत्रिक अडचणी येत असल्याने कराड तालुक्यातील अनेक नागरिकांची गैरसोय होत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. बीएलओंकडील संबंधित अर्जप्रक्रियेतील अडचणी तसेच खासगी संगणक केंद्रांवर सर्व्हर उपलब्ध नसल्याचे सांगितले जात असल्याने नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याचे चित्र आहे.

शासन व निवडणूक आयोगाकडून मतदार नोंदणीबाबत जनजागृती केली जात असताना प्रत्यक्ष नोंदणी प्रक्रियेत तांत्रिक अडथळे येत असल्याने नवीन तसेच वंचित मतदारांसमोर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः संगणक अथवा स्मार्टफोनचा वापर करता न येणाऱ्या नागरिकांना या प्रक्रियेत अधिक अडचणी येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

बीएलओंकडे मतदार नोंदणीसाठी उपलब्ध असलेल्या प्रणालीमध्ये काही तांत्रिक अडचणी येत असल्याच्या तक्रारी आहेत. विविध अर्ज भरताना प्रक्रिया पूर्ण होत नसल्याचे तसेच अर्ज अपूर्ण राहण्याचे प्रकार घडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. संबंधित प्रणाली काही दिवसांपासून कार्यरत नसल्याचे बीएलओंकडून सांगितले जात असल्याने नागरिकांना नजीकच्या संगणक केंद्रातून अथवा ऑनलाइन पद्धतीने अर्ज करण्याचा सल्ला दिला जात आहे. मात्र, काही संगणक केंद्रांवरही सर्व्हरची समस्या असल्याचे सांगितले जात असल्याने नागरिकांची कोंडी होत आहे.

### ३० हजार मतदार कमी

**दरम्यान, विशेष पुनरिक्षण प्रक्रियेत कराड तालुक्यात सुमारे ३० हजार बोगस, दुबार अथवा मृत मतदारांच्या नोंदी कमी झाल्याची आकडेवारी समोर आल्याचा दावा करण्यात आला आहे. मतदार नोंदणीसाठी वाढीव मुदत १२ ऑक्टोबरपर्यंत देण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर या कालावधीत तांत्रिक अडचणी दूर करून नागरिकांना सुलभ पद्धतीने नोंदणीची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे.**

दरम्यान, मतदार नोंदणी, नाव वगळणे किंवा दुरुस्ती तसेच स्थलांतरासाठी संबंधित अर्ज क्रमांकांचा वापर करून प्रक्रिया करता येते. मात्र, या प्रक्रियेची माहिती सर्वसामान्य नागरिकांना सहज उपलब्ध होत नसल्याची बाबही पुढे आली आहे. ग्रामीण भागातील ज्येष्ठ, अशिक्षित किंवा तंत्रज्ञानाचा वापर न करणाऱ्या नागरिकांना प्रत्यक्ष मदतीची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त होत आहे. यापूर्वी लोकसभा, विधानसभा अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान केलेल्या काही नागरिकांची नावे सध्याच्या मतदार यादीत आढळत नसल्याच्या तक्रारीही करण्यात येत आहेत. अशा नागरिकांकडून विविध कागदपत्रे मागितली जात असल्याने जुन्या नोंदी उपलब्ध नसलेल्या कुटुंबांसमोरही अडचणी निर्माण होत असल्याचे सांगण्यात येते.

# सुरुळमध्ये ग्रामस्वच्छतेचा जागर

पाटण : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून पाटण तालुक्यातील सुरुळ येथे ग्रामपंचायतीच्या वतीने 'स्वच्छ गाव-सुंदर गाव' संकल्पनेवर आधारित विशेष ग्रामस्वच्छता मोहीम राबविण्यात आली. ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत श्रमदानातून गावातील विविध भागांची स्वच्छता केली. ग्रामपंचायत कार्यालयात महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून स्वच्छता मोहिमेला प्रारंभ करण्यात आला. यावेळी ग्रामस्थांनी गाव स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा सामूहिक संकल्प केला. स्वच्छता ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.



पूजनानंतर ग्रामस्थांनी श्रमदानाला सुरुवात केली. गावातील मुख्य रस्ते, सार्वजनिक ठिकाणे तसेच परिसरातील साचलेला कचरा हटविण्यात आला. रस्त्यालगत वाढलेली झाडीझुडपेही साफ करण्यात आली. विशेषतः सुरुळ बसस्थानक परिसर आणि स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याची स्वच्छता करण्यात आली. या मोहिमेत ग्रामपंचायतीचे प्रशासक सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसंघाचे पदाधिकारी, बचत गटातील महिला, ग्रामसेवक, ग्रामसखी, कृषी सखी तसेच तरुण, ज्येष्ठ नागरिकांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महिलांचा आणि तरुणांचा सहभाग विशेष लक्षणीय ठरला.

गावातील कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करून सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात आली. प्रत्येक कुटुंबातील किमान एका व्यक्तीने स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतल्याने उपक्रमाला व्यापक लोकसहभाग मिळाला. ग्रामस्थांनी एकत्रितपणे केलेल्या श्रमदानामुळे गावातील सार्वजनिक परिसर स्वच्छ झाला. ग्रामस्वच्छतेबरोबरच लोकसहभागातून गावाच्या विकासासाठी सामूहिक प्रयत्न करण्याचा संदेश या उपक्रमातून मिळाला.

# स्त्रीशक्तीचा कलाविष्कार ;महिला मूर्तिकार दुर्गामूर्ती साकारण्यात मग्न

पुरंदर : नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर उरुळी कांचन येथील कुंभारवाडा दुर्गामातेच्या विविध रूपांच्या मूर्तींनी गजबजला आहे. येथील महिला मूर्तिकार रात्रंदिवस मेहनत घेत देवीच्या आकर्षक भावमुद्रांना आकार देत असून, त्यांच्या कलाकौशल्यातून स्त्रीशक्तीचा अनोखा आविष्कार पाहायला मिळत आहे. मूर्तिकलेच्या माध्यमातून स्वतःची ओळख निर्माण करण्याबरोबरच या महिलांनी रोजगारनिर्मितीचा मार्गही स्वीकारला आहे.

उरुळी कांचन परिसरात मोठ्या प्रमाणावर मूर्तिकला दालने असून, वर्षभर विविध देवदेवतांच्या मूर्ती तयार करण्याचे काम सुरू असते. गणेशोत्सव संपल्यानंतर दुर्गामातेच्या मूर्ती साकारण्याच्या कामाला वेग येतो. येथील सरस्वती मूर्ती कलादालनात महिला मूर्तिकार शेकडो दुर्गामूर्ती साकारण्यात व्यस्त आहेत. पारंपरिक मूर्तिकलेला आधुनिक साहित्य, तंत्रज्ञान, रंगसंगती आणि कलात्मक कल्पकतेची जोड देत देवीची विविध रूपे साकारली जात आहेत. मूर्तीचा आकार, चेहऱ्यावरील भाव, रंगसंगती, वस्त्रालंकार आणि नजरेतील भक्तिभाव यांचा सुरेख मेळ साधण्यासाठी महिला मूर्तिकार सातत्याने परिश्रम घेत आहेत.



वनिता संजय कुंभार, श्रुतिका प्रथमेश कुंभार, अनिता नितीन भिगवनकर तसेच सिद्धी आणि समृद्धी या महिला मूर्तिकार दुर्गामातेच्या मूर्तींना आकर्षक आणि सजीव भावमुद्रा देत आहेत. दिवस-रात्र काम करून त्या मूर्तिकाराबरोबरच महिला उद्योजिका म्हणूनही आपली वेगळी ओळख निर्माण करीत आहेत. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याच्या उद्देशाने या महिलांनी स्वतःचे कलादालन उभारले आहे. या उपक्रमातून इतर महिलांसह अनेक कुटुंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. दररोज शेकडो मूर्ती तयार करण्याच्या प्रक्रियेत अनेक हातांना काम मिळत असून, स्वतःच्या कुटुंबाला आर्थिक आधार देतानाच इतर कुटुंबांच्या उदरनिर्वाहालाही हातभार लावण्याचे काम या महिला करीत आहेत.

नवरात्रोत्सवात घराघरांत तसेच सार्वजनिक मंडळांमध्ये विराजमान होणाऱ्या दुर्गामातेच्या मूर्तींमागे या महिला कलाकारांची कल्पकता, कौशल्य आणि अथक परिश्रम आहेत. स्त्रीशक्तीचा जागर करणाऱ्या नवरात्रोत्सवासाठी स्त्रियाच आपल्या कलेतून देवीचे रूप साकारत असल्याने उरुळी कांचनचा हा कलाविष्कार विशेष लक्षवेधी ठरत आहे.

